# अधिसूचना

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक: ८ नोव्हेंबर, १९९६

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६

क्रमांक: पीसीएन-१६९६/प्र.क्र.५९/९६/नवि-२२, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ [सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७] याच्या कलम १५८ चे पोटकलम [१] आणि पोटकलम [२] चा खंड अडतीस] व कलम-११३ चे पोटकलम [६] आणि कलम ५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र नवीन नगर विकास प्राधिकरण [सदस्यांचा पदावधी व सेवेच्या शर्ती] नियम,१९७६ मध्ये सुधारणा करण्या-साठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम-१५८, पोटकलम [१] अन्वये पूर्व प्रसिध्द करण्यात आले आहेत.

## नि य म

१] या नियमांस महाराष्ट्र नवीन नगर विकास प्राधिकरणे [सदस्यांचा पदावधी व सेवेच्या शर्ती] [सुधारणा] नियम, १९९६ असे म्हणता येईल.

२] महाराष्ट्र नवीन नगर विकास प्राधिकरणे [सदस्यांचा पदावधी व सेवेच्या शर्ती] नियम-१९७६ च्या नियम ३ च्या पोटनियम [१] चे तिसरे परंतुक वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

के. नलिनाक्षन
महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव